# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly Pune University)
Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. सीए/ 1200

दिनांक : 21/07/2024

**तातडीचे व महत्वाचे**

प्रति,
**मा. प्राचार्य / संचालक,**
सर्व संलंग्नित व्यावसायिक महाविद्यालय /
मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय : आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरून महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय / परिसंस्थांना दिलेल्या विविध मान्यतेबाबत.**

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / परिसंस्था / महाविद्यालयांना तसेच स्वायत्त महाविद्यालय / परिसंस्थांना विविध मान्यता देण्यात आलेले शासन निर्णय निर्गमित केलेले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, एमबीए, पीजीडीएम, एमसीए, प्लॅनिंग, डिझाईन इ. पदवी व पदव्यूत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे, अभ्यासक्रम बंद करणे, विद्यार्थी प्रवेश क्षमतेत घट करणे इ. विविध मान्यता देण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

सदर बाब विचारात घेता सोबतच्या परिशिष्ट – 'अ' व 'ब' मध्ये नमूद केलेली कागदपत्रे तपासणीसाठी विद्यापीठाच्या www.unipune.ac.in संकेतस्थळावर BCUD LOGIN>ONLINE SERVICES येथे माहिती भरून आवश्यक कागदपत्रे दि. २२/०७/२०२४ पासून दि. २४/०७/२०२४, सायं. ०६.०० वा. पर्यंत अपलोड करण्यात यावीत.

कळावे,

उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
21/7/24

## परिशिष्ट 'अ'

**शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत...**

१. सध्याच्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल.

२. नवीन अभ्यासक्रम सुरू करणे.

३. सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ.

४. पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे.

५. तुकडी पूर्ण करणे.

माहे सप्टेंबरमध्ये २०२३ मध्ये नविन शैक्षणिक वर्षासाठी (२०२४—२०२५) ऑनलाईन प्रस्ताव सादर केला नसल्यास खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. सप्टेंबर, २०२३ मध्ये नवीन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय / नवीन अभ्याक्रम/विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ /अभ्यासक्रमाच्या नावात बदल इ. करण्याकरिता फी भरलेली नाही अशा महाविद्यालयांनी चलन काढून घेणे.

२. शासन निर्णयानंतर राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेव खालीलप्रमाणे असणे आवश्यक :—

अ) नविन अभ्याक्रमाकरिता/अभ्यासक्रमाच्या नावात बदल: रुपये ५.००लाख (प्रत्येकी अभ्यासक्रमाकरीता स्वतंत्र)

ब) विद्यार्थी क्षमता वाढ :— रुपये ३.०० लाख (प्रत्येक अभ्यासक्रमाकरीता स्वतंत्र)

क) नवीन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय :— रुपये १५.०० लाख

३. बँकेचे संयुक्त हमी पत्र — संस्थेच्या लेटरहेडवर— संस्थेचा सही शिक्का आणि बँकेचा सही शिक्का असणे आवश्यक.

४. रु. ५००/— च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र देणे आवश्यक.(सोबत नमुना जोडला आहे)

## परिशिष्ट 'ब'

**शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून अभ्यासक्रम बंद/ विद्यार्थी प्रवेश क्षमता घट करणेबाबत.**

*संबंधित अभ्यासक्रमासाठी यापुर्वी प्रवेशित केलेली विद्यार्थी व शिक्षकवृंद व तांत्रिक कर्मचारी यांचे दायित्वाबाबतचे रु. ५००/— च्या स्टँपपेपरवरील नोंदणीकृत हमीपत्र संलग्नता कक्षास सादर करावे.

(५०० रु. च्या स्टँप पेपरवरील हमीपत्राचा नमुना खालीलप्रमाणे)

## हमीपत्र

आम्ही......संस्था...........चे.........महाविद्यालय.......पत्ता...........खालीलप्रामाणे हमीपत्र लिहून देतो की,

१. महाविद्यालयामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणारा ............ अभ्यासक्रम (पदवी व पदव्युत्तर पदवी) उपलब्ध आहेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली (AICTE)/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली (PCI)/राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)/Council of Architecture(COA) यांच्या विहित मानका व प्रमाणकानुसार महाविद्यालयात आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली (AICTE)/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली (PCI)/राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)/Council of Architecture(COA) यांच्या विहित मानकानुसार महाविद्यालयामध्ये आवश्यक ती शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद नेमलेला आहे.

४. विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी............लाख मुदत ठेव बँकेचे नाव..........................., शाखेचे नाव.....................या शाखेत ठेवण्यात आली आहे ती विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय सदर ठेव काढणार नाही.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली (AICTE)/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली (PCI)/राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)/Council of Architecture(COA) यांच्या विहित मानका व प्रमाणकानुसार तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्या नियमानुसार महाविद्यालयामध्ये नेमलेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार नियमित वेतन देण्यात येईल अशी मी हमी देतो.

| | |
|---|---|
| प्राचार्य,<br>महाविद्यालयाचे नाव<br>सही व शिक्का | अध्यक्ष/सचिव<br>संस्थेचे नाव<br>सही व शिक्का |

स्थळ :—

दिनांक :—

युनिपुणे आय-डी :—

( संस्थेच्या लेटरहेडवरील संस्थेच्या आणि बँकेच्या संयुक्त हमीपत्राचा नमुना खालीलप्रमाणे)

## संयुक्त हमीपत्र

मी, प्राचार्य / संचालक,..........................................खालीलप्रामाणे हमीपत्र लिहून देतो की, या.......................महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी, नविन कोर्स नाव :—......... ...............तुकडी वाढ ..................नव्याने सुरू करणेसाठी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी लागणारे प्रति अभ्यासक्रम रु.............. च्या मुदत ठेवी बँकेच्या खाली नमूद केलेल्या शाखेत केलेल्या असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या पूर्व परवागनी शिवाय सदर ठेव काढणार नाही.

| अ. क्र. | मुदत ठेव पावती क्र. व दिनांक | बँकेचे नाव | पावतीचा कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| प्राचार्य,<br>महाविद्यालयाचे नाव | बँकेचे नाव,<br>सही व शिक्का |
|---|---|

स्थळ :—

दिनांक :—

# JOINT UNDERTAKING

(for Fixed Deposit)

We hereby state that:

………………………………Society's……………………college……………………cunducting…… …………courses since last…………years.

The……(course name)…………………………………………………………courses run by……….(college name)……………………is affiliation to the Savitribai Phule Pune University, approved by the All India Council for Technical Education (AICTE)/ Pharmacy Council of India (PCI), Directorate of Technical Education, Maharastra State and recognized by the Govt. of Maharastra. We are applying for …………………………………Course to SPPU, from the Academic Year 2023-2024. The Management of the institute/college has kept following fixed deposit in following branch and the original receipt will kept in the custody of the institute/college.

We hereby undertake that the below mentioned fixed deposit will not be withdrawn/utilize without permission of Savitribai Phule Pune University and other competent authorities.

| Sr. No. | Fixed Deposit Receipt No. | Bank Name | Date of FDR | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

This undertaking has been submitted to Savitribai Phule Pune University with.

| | |
|---|---|
| Branch Manager<br>Bank Name | Principal<br>College Name |

Date:

Place:

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४२/४४३/४४७

ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक/कालमर्यादित

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२४/५०८ दिनांक : 19 JUL 2024

प्रति,

प्राचार्य/संचालक

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र - १२२४/प्र.क्र.०३/कें.प्र.प्र./२०२४/९६८,दिनांक १०.६.२०२४

२) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २ /एनजीसी/Intake Approval/२०२४/४४० दिनांक : ३.७.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता/ समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg24.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन दि. १९ जुलै २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र थोडयाच संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केल्याचे निदर्शनास आले आहे. प्रवेशासंबंधी माहिती,त्याची संवेदनशीलता आणि कालमर्यादा विचारात न घेता संस्थांनी माहिती भरण्याबाबत दर्शविलेली दिरंगाई समर्थनीय नाही.

ज्या संस्थांच्या प्रवेशक्षमता वाढ,घट,अभ्यासक्रमाच्या नावात बदल इत्यादी बाबी प्रस्तावित नाहीत अशा सर्व संस्थांनी त्यांची माहिती प्राथम्याने तात्काळ सदर लिंकवर अद्ययावत करुन विभागीय कार्यालयाकडून निश्चित करुन घ्यावी. तसेच ज्या संस्थांचे प्रवेशक्षमता वाढ,घट,अभ्यासक्रमाच्या नावात बदल इत्यादी प्रस्ताव शासन निर्णयाकरिता प्रलंबित असून शासन निर्णयाअभावी माहिती भरता आलेली नाही अशा संस्थांनी त्यांचे शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता प्राप्त करुन घेऊन त्याची माहिती ३ दिवसांत सदर लिंकवर अद्ययावत करणे आवश्यक आहे. सर्व संस्थांनी दिनांक २६.७.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.प्रधान सचिव ,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सादर

२.मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित